दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)

24 तास सेवा || श्री नागनाथ कृपा || प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121

सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स

CHEMIST & DRUGIST

शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल

सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील

मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

कोकण || वर्ष ६ वे || अंक १८१ || रविवार २८ जून २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## शिवछत्रपतींचा ३५३ वा शिवराज्याभिषेक सोहळा रायगड किल्यावर उत्साहात साजरा

रायगड :- रायगडावर पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी गडावरील पाणीपुरवठा योजनेला नक्की मंजुरी देऊ अशी घोषणा उपमुखमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

यासोबतच यंदा पावसाने काहीशी ओढ दिली असली तरीही अवघड परिस्थिती आल्यास महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील असेही त्यांनी सांगितले. रायगड शिवराज्याभिषेक दिनोत्सव समिती आणि कोकणकडा मित्र मंडळ यांनी तिथीप्रमाणे आयोजित केलेल्या शिवराज्यभिषेक सोहळ्यासाठी शिंदे आज रायगडावर उपस्थित होते. त्यावेळी बोलताना त्यांनी ही ग्वाही दिली. यासोबतच लाडकी बहिण योजनेचे पैसे कधीही बंद होणार नाहीत याचाही त्यांनी पुनरुच्चार केला.

यावेळी बोलताना त्यांनी आज आपण या रायगडच्या पवित्र भूमीत उभे आहोत. हा रायगड नुसता दगड धोंड्याचा किल्ला नाही तर आपल्या स्वाभिमानाचा कणा आहे. इथे उभे राहिले की अंगावर रोमांच उभे राहतात, छाती अभिमानाने फुलून येते, जेव्हा या मातीमध्ये ३५३ वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला तेव्हा काय आनंदोत्सव साजरा झाला असेल. तो सोहळा डोळे दिपवून टाकणारा असेल त्यामुळेच आपण हा दिवस तिथीप्रमाणे साजरा करतो.

स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनीही तिथीप्रमाणे हा सोहळा साजरा करा असे सांगितले होते. मात्र तारखेप्रमाणेही इथे शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा नुकताच साजरा करण्यात आला. या सोहळ्याचे महत्त्व असे आहे की तो कितीही वेळा साजरा केला तरीही त्याला येण्यासाठी शिवभक्तांचा उत्साह कमी पडणार नाही असे सांगितले.

मंत्री भरतशेठ गोगावले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ३० वर्षापूर्वी हा सोहळा आयोजित करायला सुरवात केली त्यात सहभागी होणाऱ्या शिवभक्तांची संख्या वर्षागणिक वाढत गेली. रायगड शिवराज्याभिषेक दिनोत्सव समिती आणि कोकणकडा मित्र मंडळ यांनी हा सोहळा आयोजित करायला सुरुवात केली, आणि शासनाने या आयोजनाला राजमान्यता दिली. आता हा उत्सव महोत्सव म्हणून नावारूपाला आला असल्याचे सांगितले.



याच मातीत आपल्या राजाने हिंदवी स्वराज्याचा भगवा फडकवला, याच मातीत मराठा साम्राज्य जन्माला आले, आज मराठी अस्मितेचा हुंकार दाही दिशांना दुमदुमला आहे. ३५३ वर्षापूर्वी आजच्याच तिथीला शिवाजी महाराज हे छत्रपती झाले, मराठी मनांचे राजे झाले. शिवराज्याभिषेक सोहळा हा केवळ राजकीय सोहळा नव्हता. तर पारतंत्र्यात पिचलेल्या मराठी जनतेला सार्वभौम राजा मिळाल्याची ती एक ऐतिहासिक घटना होती. आजचा दिवस प्रत्येक मराठी माणसासाठी स्वराज्य स्वधर्म आणि लोककल्याण या कर्तव्याचे स्मरण करून देणारा आहे. आजच्या दिवशी आपले राजे फक्त सिंहासनावर बसले नाही तर जनतेच्या काळजात जाऊन बसले असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

महाराजांनी कधी जात पात पाहिली नाही, माणूस पहिला दीनदुबळ्यांचे कल्याण एवढाच त्यांचा ध्यास होता. महिलांचा सन्मान कसा ठेवायचा ते शिकवले आहे. त्यामुळे त्यांचे जगणे आजही आपल्याला आदर्शवत आहे. त्यांचे आरमार, युद्धनीती, न्यायव्यवस्था, पर्यावरणाचा विचार हे सगळे आजही आपल्याला दिशा देत आहेत.

मी देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांना धन्यवाद देतो की छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा त्यांनी नौदलाच्या नवीन लोगोमध्ये अंतर्भूत केली आहे. या कृतीद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांची किर्ती सातासमुद्रापार पोहोचली आहे.

आदर्श राजा कसा असावा याचे उदाहरण छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिला. त्यामुळेच आज इतक्या वर्षांनी देखील त्यांचा जयंती दिवस, शिवराज्याभिषेक सोहळा त्याच उत्साहात साजरा केला जातो. दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर देखील छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली जाते. अनेक देशांमध्ये विद्यार्थी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करतात.

आपल्या देशात अनेक बादशहा झाले, अमलगिर होऊन गेले मात्र याच मातीमध्ये गाडले गेले हे या महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. मराठी माणसाची अस्मिता त्याचा स्वाभिमान शिवाजी महाराजांनी जागृत केला. ज्या लोकशाहीचे आपण गोडवे गातो त्याचा पहिला धडा या राज्यभिषेक सोहळ्याद्वारे त्यांनी घालून दिला. आपण आज जो मोकळा श्वास घेतो त्याचे श्रेय या राज्याभिषेकाला आहे.


या राज्याभिषेकापूर्वी चलनात मुघलांची नाणी वापरावी लागत होती, जमीन मोजायला त्यांची पद्धत वापरावी लागत होती. शेतसारा मुघलांच्या पद्धतीने आकारला जात होता, दक्षिणेतील सारा कारभार फारशी किंवा उर्दू भाषेत चालायचा. या सगळ्या परंपरा महाराजांनी खंडित केल्या. त्यांनी स्वतःची शिवराज्याभिषेक शक हे नवे कॅलेंडर सुरू केले. स्वतःची सोन्याची नाणी घडवली, शेतकरी कल्याण, महसूल प्रशासन यांची घडी घातली. दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज आणि मोफत जनावरे देण्याची व्यवस्था केली. सैन्याला आदेश होते की शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठाला देखील हात लागता कामा नये, असे नीतीने त्यांनी राज्य केले.महिलांचा आदर, धार्मिक सलोखा राखण्यासाठी फक्त कायदे केले नाहीत तर स्वतःच्या वागण्यातून तसे उदाहरण घालून दिले. जुनी जमीनदारी वतनदारी पद्धत मोडीत काढली, महसूल गोळा करण्यासाठी अधिकाऱ्यांची नेमणूक केली. गडावर पाण्याची सोय केली, शत्रूवर मारा करण्यासाठी तोफांची रचना केली. महाराजांच्या हातून महाराष्ट्र घडला. सगळ्यात महत्वाचे म्हणजे ते स्वतःला जनतेचा मालक न समजता जनतेचा सेवक समजायचे.

माझ्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात मी शिवसृष्टीला मान्यता दिली. आज देवेंद्रजींच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात हे काम पुढे चालू आहे. रायगड किल्यासह राज्यातील १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. छत्रपतींचं कार्य यानिमित्ताने जगभरात पोहचत आहे ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब असल्याचे यावेळी आवर्जून नमूद केले.

यावेळी रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले, गृहराज्यमंत्री योगेश कदम, माजी आमदार रुपेश म्हात्रे, युवासेना कोअर समिती सदस्य विकासशेठ गोगावले, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते आणि हजारो शिवभक्त यावेळी आवर्जून उपस्थित होते.

## संजय दिना पाटलांच्या धमकी विरोधात राज्यभर परिषदेची निदर्शने

मुंबई : पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी देत अवमानकारक भाषा वापरणाऱ्या खासदार संजय दिना पाटील यांच्या विरोधात गडचिरोलीपासून सिंधुदुर्ग पर्यत राज्यभर तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. ''माफी मान्य नाही, गुन्हा दाखल करा'' या स्पष्ट भूमिकेसह अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, डिजिटल मीडिया परिषद आणि पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रभर निषेध आंदोलने करण्यात आली. ङ्गङ्गअखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा. एस. एम. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात पत्रकारांनी पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर होणारे हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला.




आंदोलनादरम्यान पत्रकारांनी ''पत्रकारांचा अपमान सहन करणार नाही'', ''पत्रकारांवर हल्ला खपवून घेणार नाही'', ''पत्रकार एकता जिंदाबाद'' आणि ''माफी नाही, कारवाई हवीच'' अशा जोरदार घोषणा देत संबंधित खासदारावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. ङ्गङ्गयावेळी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर अशा प्रकारे धमक्या देणे ही अत्यंत गंभीर बाब असून, केवळ माफी मागितल्याने गुन्ह्याचे गांभीर्य कमी होत नाही. पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. ङ्गसातारा, बीड, गडचिरोली, रायगड, ठाणे,नांदेड, परभणी, सांगली पुणे सह ङ्गराज्यातील विविध जिल्हे, तालुके आणि शहरांमध्ये पत्रकारांनी मोठ्या संख्येने सहभागी होत निषेध नोंदवला. याप्रसंगी सर्व पत्रकार संघटनांनी एकजुटीने पत्रकारांच्या सन्मानाचे आणि सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी भविष्यातही आवश्यक ते सर्व लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

## अलिबाग तालुका काँग्रेसच्या अध्यक्षपदी सुनिल दशरथ थळे यांची नियुक्ती; कार्यकर्त्यांकडून उत्साहात स्वागत

अलिबाग (प्रतिनिधी)

रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ काँग्रेस नेते, समाजाभिमुख कार्यकर्ते आणि विविध शैक्षणिक व सहकारी संस्थांशी निगडित असलेले सुनिल दशरथ थळे यांची अलिबाग तालुका काँग्रेस अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीचे काँग्रेस पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.ङ्गसुनिल थळे यांनी अनेक वर्षे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. ते रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष, मापगाव ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच, लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाचे कायम संचालक, सुमती प्रगती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, सेवा शक्ती पतपेढीचे संचालक तसेच रायगड जिल्हा काँग्रेसचे माजी ओबीसी अध्यक्ष म्हणून विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळत आले आहेत.ङ्गसामाजिक बांधिलकी जपत गोरगरीब, शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठवणारे नेते म्हणून त्यांची ओळख आहे. अलिबाग तालुक्यातील नागरिकांच्या सुख-दुःखात कायम सहभागी राहणारे आणि सर्वांना आपलेसे वाटणारे नेतृत्व म्हणून त्यांना मान मिळत आला आहे.ङ्गत्यांच्या नेतृत्वाखाली अलिबाग तालुक्यात काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होईल, पक्षाला नवसंजीवनी मिळेल तसेच सर्वसामान्य जनतेचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील, असा विश्वास काँग्रेस कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.ङ्गयावेळी अलिबाग तालुका काँग्रेस कार्यकर्त्यांनी सुनिल दशरथ थळे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांच्या पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक बळकट होऊन जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी नवी ऊर्जा मिळेल, असा आशावादही व्यक्त करण्यात आला. सुनील दशरथ थळे यांनी काँग्रेस पक्षश्रेष्ठींचे या नियुक्तीबद्दल आभार मानले आहेत.



## पाली-खोपोली राज्य महामार्गाची दुरवस्था निष्कृष्ट दर्जाच्या कामामुळे अवघ्या काही दिवसात हेदवली येथे मोठा खड्डा अपघातांना आमंत्रण

रा. जि. उ. उपसंपादक /मंगेश यादव : पाली-खोपोली राज्य महामार्गावर प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. काही वर्षांपूर्वीच या महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण झाले होते, मात्र निकृष्ट दर्जाच्या कामामुळे अवघ्या काही वर्षांतच रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. सध्या या महामार्गावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले असून, हेदवली येथे तर रस्त्याच्या कडेला मोठा आणि धोकादायक खड्डा पडला आहे, ज्यामुळे येथे कधीही मोठा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

रात्रीच्या वेळी किंवा पावसाच्या दिवसात हा खड्डा वाहनचालकांच्या लक्षात न आल्यास भीषण अपघात घडू शकतो. या महामार्गावर काही ठिकाणी चक्क काँक्रीटच्या रस्त्याला डांबरीकरण करण्यात आले आहे. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यावरील खड्ड्यांचे साम्राज्य वाढत चालले असून अपघातांची मालिका देखील सुरूच आहे. फक्त हेदवलीच नव्हे, तर उंबरे गावाच्या अलीकडे, मिरकुटवाडी, गोंदाव फाटा, परळी, जांभूळपाडा, वऱ्हाड, रासळ आणि वझरोली अशा अनेक ठिकाणी रस्त्यावरती मोठे खड्डे पडले आहेत. तसेच रस्त्याच्या मधोमध काँक्रीट जाऊन त्या ठिकाणी रुंद भेगा पडल्या आहेत. यामुळे वाहनचालकांना आपला जीव मुठीत धरून, अत्यंत सावधगिरीने वाहने चालवावी लागत आहेत.



स्थानिक तसेच रोज प्रवास करणाऱ्या चालकांना या खड्ड्यांचा अंदाज असतो, मात्र या मार्गावर येणाऱ्या नवीन वाहनचालकाला अचानक समोर येणाऱ्या खड्ड्यामुळे गाडीवरचे नियंत्रण ठेवणे कठीण होते. अचानक ब्रेक दाबल्यामुळे किंवा गाडी अचानक खड्ड्यात गेल्यामुळे बाचकायला होऊन सातत्याने अपघाताची स्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे एमएसआरडीसीने या गंभीर समस्येकडे तात्काळ लक्ष देऊन, केवळ वरवरची डागडुजी न करता हेदवलीसह इतर सर्व ठिकाणचे खड्डे दर्जेदार पद्धतीने बुजवावेत, जेणेकरून वाहनचालकांचा प्रवास सुरक्षित होईल.

पाली खोपोली राज्य महामार्ग दुरवस्थे संदर्भात एमएसआरडीसी कार्यकारी अभियंता सारंग इनामदार यांच्यासोबत बोलणे झाले असता त्यांनी सांगितले की या राज्य महामार्गाची देखभाल दुरुस्ती लवकरच करण्यात येईल. तसेच रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम लागलीच करण्यात येईल असे इनामदार म्हणाले.

पाली-खोपोली महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम होऊन काहीच वर्षे झाली आहेत, पण रस्ता एवढ्या लवकर खराब होणे हे कामाच्या अत्यंत निकृष्ट दर्जाचे लक्षण आहे. प्रशासनाने आणि संबंधित ठेकेदाराने तात्काळ दखल घेऊन रस्त्याची योग्य ती डागडुजी करावी. जर प्रशासनाने यावर लवकरच कायमस्वरूपी उपाययोजना केली नाही आणि यामुळे एखादा अपघात घडला, तर त्याला सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल. अन्यथा मनसे स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आम्ही प्रशासनाला देत आहोत.

सुनील साठे, अध्यक्ष, मनसे, सुधागड तालुका

## संपादकीय

# पेरणीयोग्य पावसाची प्रतीक्षा

प्रतीक्षेनंतर मराठवाड्यात मान्सूनने अखेर हजेरी लावली असली तरी पेरणीसाठी आवश्यक असलेल्या दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. काही जिल्ह्यांत झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, तर अनेक भागांतील शेतकरी अजूनही समाधानकारक पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. महिनाभरापासून दडी मारलेल्या मान्सूनने अखेर मराठवाड्यात हजेरी लावली आहे. त्यामुळे रखडलेल्या पेरण्यांना काहीसा वेग मिळण्याची शक्यता आहे. मंगळवार आणि बुधवारी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली. यामध्ये सर्वाधिक पाऊस छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांत नोंदवला गेला. मात्र बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये अद्यापही पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. त्यामुळे येथील शेतकरी अजूनही दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. महसूल विभागाच्या निकषानुसार, २४ तासांत ६५ मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस झाल्यास संबंधित मंडळात अतिवृष्टी झाल्याचे मानले जाते. दरम्यान, जालना जिल्ह्यात सर्वाधिक २१.० मिलिमीटर, तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १९.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाला, तर जरंडी गावाजवळील मातीचा पूल पावसामुळे वाहून गेल्याने या मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. तसेच पुराच्या पाण्यात एक दुचाकी वाहून गेली होती. मात्र ग्रामस्थांनी तत्परता दाखवत दुचाकीस्वाराचा जीव वाचवला. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात पावसानंतर ओढे आणि नाल्यांना पूर आला. आडगाव बाजार ते आडगाव फाटा या रस्त्यावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे बंद झाली होती. त्यामुळे ग्रामस्थ आणि वाहनधारक पुराच्या पाण्यात अडकले होते. परभणी शहरात बुधवारी सकाळपासून हलक्या पावसाला सुरुवात झाली. जिल्ह्यातील पाथरी, मानवत, जिंतूर, येलदरी, सेलू, बोरी, आसेगाव आणि ताडकळस या भागांतही पावसाने चांगलीच हजेरी लावली.

नांदेड जिल्ह्यातील हदगाव, अर्धापूर, मुखेड, कंधार आणि मुदखेड या भागांत मेघगर्जनेसह दमदार पाऊस झाला. हदगाव येथे तब्बल तीन तास मुसळधार पाऊस कोसळला. या पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले असून काही भागांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले होते. नांदेड जिल्ह्यात आतापर्यंत ८ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. आता शेतीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याने उर्वरित पेरणीच्या कामाला वेग येण्याची शक्यता आहे. धाराशिव जिल्ह्यातील शेतकरीही पेरणीयोग्य पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. २४ जूनपर्यंत धाराशिव जिल्ह्यात सरासरीच्या १२.९ टक्के इतक्या पावसाची नोंद झाली आहे. हिंगोली जिल्ह्यात बुधवारी जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मृग नक्षत्र कोरडे गेल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या होत्या; मात्र आता पावसाने हजेरी लावल्याने हिंगोली जिल्ह्यातील शेतजमिनींमध्ये पाणी साचले आहे. मराठवाड्यात सर्वाधिक पाऊस जालना जिल्ह्यात झाल्याची नोंद आहे. जिल्ह्यातील चार महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. रामनगर महसूल मंडळात १०९ मिलिमीटर, धनगर पिंपरी येथे ९१ मिलिमीटर, तर जालना शहर आणि पाचनवडगाव येथे प्रत्येकी ८७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. अंबड शहरात ५३ मिलिमीटर पाऊस झाला. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून अनेक भागांतील शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली आहे. बीड जिल्हा वगळता इतर जिल्ह्यांत कमी-अधिक प्रमाणात पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पेरणीची लगबग सुरू झाली आहे. दरम्यान, राज्यात मान्सून वेगाने पुढे सरकत आहे. बुधवारी उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील उर्वरित भागांत प्रगती करत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापल्याची माहिती हवामान विभागाने दिली. पुढील तीन दिवस मराठवाडा आणि विदर्भात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.सध्या मराठवाड्यात ढगाळ वातावरण निर्माण झाले असून काही ठिकाणी अधूनमधून भुरभुर पाऊस पडत आहे. त्यामुळे लवकरच दमदार पावसाला सुरुवात होईल, अशी आशा शेतकऱ्यांना लागली आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये खरीप हंगामासाठी पोषक वातावरण तयार झाले असून शेतकऱ्यांमध्ये पेरणीबाबत उत्सुकता वाढली आहे. मात्र, हवामान विभागाने किमान १०० मिलिमीटर पाऊस झाल्यानंतरच पेरणी करण्याचे आवाहन केल्याने अनेक भागांतील शेतकऱ्यांनी सध्या पेरणी थांबवली

# दाभोळमध्ये रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचा शुभारंभ; गरजू रुग्णांना मोठा दिलासा

दापोली प्रतिनिधी :- तालुक्यातील दाभोळ परिसरातील गरजू रुग्णांच्या सोयीचा विचार करून कै. कृष्णामामा महाजन स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने रुग्णोपयोगी साहित्य केंद्राची स्थापना काल दिनांक २६ जुन २०२६ रोजी करण्यात आली आहे.

या केंद्रामध्ये फाऊलर बेड, व्हीलचेअर, वॉकर, स्टिक, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर, स्ट्रेचर, कमोड चेअर, युरिन पॉट आदी आवश्यक वैद्यकीय साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.ङ्गया केंद्राला दाभोळचे सुप्रसिद्ध दिवंगत वैद्यकीय तज्ज्ञ कै. डॉ. मधुकर भिकाजी लुकतुके यांचे नाव देण्यात आले आहे. केंद्रासाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी डॉ. लुकतुके यांचे नातू आदित्य पंडित आणि शंतनू गुर्जर यांनी प्रतिष्ठानला मोलाचे सहकार्य केल्याची माहिती प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष मिहीर महाजन यांनी दिली.

उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, ''कै. कृष्णामामा महाजन स्मृती प्रतिष्ठानतर्फे सुरू करण्यात आलेले हे केंद्र दाभोळ परिसरातील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.



तसेच या उपक्रमाचे नियोजन करणारी युवकांची टीम निस्वार्थ भावनेने कार्य करत असून त्यांचे विशेष कौतुक वाटते.'

या कार्यक्रमास दाभोळ परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष बिपीनदादा पाटणे, कार्यवाह गंगाराम इदाते, डॉ. आनंद गोंधळेकर, रोहन तोडणकर, ओमकार कात्रे, राहुल गोंधळेकर, कौस्तुभ वैद्य, रोहन यादव, दीप कुडाळकर, दीपक कुतरेकर, संदेश साळवी, सुनील पाथे, विनय पारदळे, पंकज पालकर, किशोर तांबडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# लालबहादूर शास्त्री हायस्कूलमध्ये वक्तृत्व स्पर्धा संपन्न

मंडणगड : प्रतिनिधी,येथील मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित लाल बहादूर शास्त्री हायस्कूल दहागाव मध्ये, आज शनिवार दिनांक २७ जून २०२६ रोजी छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.ङ्ग या स्पर्धा पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी अशा दोन गटात घेण्यात आल्या. दोन्ही गटातून मिळून ३० स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते.ङ्ग सर्वप्रथम प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. विजय खाडे यांचे कार्यक्रमाला उपस्थित राहिल्यामुळे सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. किशोर कासारे यांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. यानंतर वकृत्व स्पर्धेला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी आपल्या ओघवत्या शैलीत शाहू महाराजांचे जीवन व कार्य सांगितले.ङ्ग या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववी मधील विद्यार्थिनी कुमारी स्मरणिका गायकवाड हिने केले. लहान गटातून १) कुमारी आर्या तांबूटकर प्रथम क्रमांक २)कुमारी मुक्ताई येरवणकर द्वितीय क्रमांक तर ३)प्रांजल वाजे हिने तृतीय क्रमांक पटकावला. मोठ्या गटातून १) कुमारी सीया येरुणकर प्रथम क्रमांक) कुमारी सान्वी दळवी द्वितीय क्रमांक ३) कुमारी आर्या भानत हिने तृतीय क्रमांक पटकावला. या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून सौ.मानसी पालांडे, सौ. विनया नाटेकर व श्री. जितेंद्र कलमकर व




ङ्ग वेळाधिकारी म्हणून श्री. मनोज चव्हाण यांनी काम पाहिले.ङ्ग प्रशालेतील शिक्षक श्री. किशोर कासारे यांनी विद्यार्थ्यांना सादरीकरण विषय ज्ञान व सभाधिटपणा याबाबत मार्गदर्शन केले. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.ङ्ग या कार्यक्रमाला प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.विजय खाडे, शिक्षिका सौ.मानसी पालांडे, सौ.विनया नाटेकर, सौ. अनिता बिराजदार, श्रीमती वैशाली पुदाले,शिक्षक श्री. विक्रम शेले, श्री.मनोज चव्हाण,श्री. जितेंद्र कलमकर,श्री.किशोर कासारे तसेच शिक्षकेतर कर्मचारी भाऊसाहेब श्री. प्रशांत कदम, भाई गुडेकर, संजय गौड व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.बी.ए.हायस्कूल मंडणगड येथे पल्स पोलिओ लसीकरण जनजागृती मोहिम रॅली उत्साहात संपन्न

## मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित डॉ.बी.ए हायस्कूलचा उपक्रम; नागरिकांना लसीकरणासाठी आवाहन

मंडणगड (प्रतिनिधी) : डॉ. बी.ए.हायस्कूल मंडणगड येथे दि.२७जून २०२६ रोजी शाळेच्या वतीने शासनामार्फत दि.२८ जून २०२६रोजी होणाऱ्या 'पोलिओचे दोन थेंब बालकांसाठी' या पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेबाबत जनजागृती करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही जनजागृती रॅली शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा भरत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली.ङ्गपल्स पोलिओ लसीकरण मोहिमेची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी मंडणगड आरोग्य विभागाचे अधिकारी डॉ. अभिषेक गावंडे, आरोग्य पर्यवेक्षक-तातू महादू पारधी,आरोग्य अधिकारी तौफिक शेख उपकेंद्र नारगोली, व्ही. एम. उबाळे (आरोग्यसेवक) तसेच शिगवण मॅडम (आशा स्वयंसेविका) यांच्या मार्गदर्शनाखाली ही जनजागृती मोहीम राबविण्यात आली.ङ्गयावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा पाटील व आरोग्य अधिकारी डॉ. अभिषेक गावंडे यांनी शहरी तसेच ग्रामीण भागातील सर्व पालकांना आपल्या बालकांना पोलिओचा डोस देऊन या राष्ट्रीय मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले.ङ्गही जनजागृती रॅली शाळेच्या परिसरातून सुरू होऊन शहरातील प्रमुख मार्गाने एस.टी. बस स्थानकापर्यंत काढण्यात आली. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी पोलिओ



निर्मूलनाबाबत जनजागृतीपर घोषणा देत नागरिकांचे लक्ष वेधले.ङ्गया कार्यक्रमाला तालुक्यातील अधिकारी, विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सांस्कृतिक विभाग प्रमुख बजरंग गावडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.ङ्ग''एकही बालक पोलिओपासून वंचित राहू नये'' या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या जनजागृती मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# नागोठणे पोलिस ठाण्याचा कार्यभार सपोनि रविंद्र पारखे यांच्या हाती; कायदा व सुव्यवस्था तत्पर राखण्यासाठी सदैव प्रयत्नशील!

सहसंपादक -: नारायण म्हात्रे

नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक म्हणून म्हसळा पोलिस ठाण्यातून बदलून आलेले रविंद्र पारखे यांनी पदभार स्वीकारला असून त्यांनी म्हसळा येथे कार्यरत असताना ब-याचशा गुन्ह्यांची उकल करुन गुन्हेगारांना वेळीच अटक करण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे, यामध्ये विशेष करून मोबाईल, सोने व काही इतर चो-यांचा महत्वपूर्ण तपास करण्याचे काम केल्याने काही दिवसांपूर्वी रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांनी त्यांचा व संपूर्ण पोलिस पथकाचा विशेष गौरव केला होता. या त्यांच्या कामगिरीचा आढावा पाहून नागोठणे हे कोकणचे मध्यवर्ती व गजबजलेले ठिकाण असल्याने त्यांना त्वरीत एका चांगल्या शहराचे पोलिस ठाणे सांभाळण्याची जबाबदारी देवून नागोठणे पोलिस ठाण्यात बदली केली आहे व त्यांनी त्वरित वरिष्ठांचा आदेश पालत बुधवार २४ जून रोजी रात्री पदभार स्वीकारला. यापूर्वी नागोठणे येथे असणारे प्रभारी सहायक पोलिस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांची अलिबाग येथे जिल्ह्याच्या पोलिस मुख्यालयात बदली झाली आहे, त्यांच्या जागी नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक म्हणून रविंद्र पारखे यांनी पदभार घेताच नागोठणे विभागातील सर्व पक्षीय कार्यकर्ते, पत्रकार, सामाजिक संघटनांनी त्यांचे स्वागत केले आहे व पुढील कारकिर्दीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



## चांदोरेच्या विकासाला नवी झेप; गावदेवी मंदिर व तलाव सुशोभीकरण अंतिम टप्प्यात

### नामदार भरतशेठ गोगावले यांच्या विकास निधीतून ऐतिहासिक चांदोरे गावात विकासकामांना वेग; ग्रामस्थांत समाधानाचे वातावरण

माणगाव ता. प्रतिनिधी : नंदकुमार चांदोरकर

माणगाव : रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील ऐतिहासिक चांदोरे गावात विविध विकासकामांना वेग आला असून, धार्मिक व सार्वजनिक स्थळांच्या सुशोभीकरणामुळे गावाच्या सौंदर्यात लक्षणीय भर पडत आहे. पं.स. माजी सभापती सुजित शिंदे शिष्टमंडळ यांच्या विशेष पाठपुराव्यातून आणि नामदार भरतशेठ गोगावले यांच्या विकास निधीतून ही कामे साकार होत असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.ङ्गगावातील प्राचीन गावदेवी मंदिराच्या सुशोभीकरणाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून, मंदिराचे आकर्षक रूप लवकरच भाविकांच्या सेवेत दाखल होणार आहे.

मंदिर परिसरात करण्यात आलेल्या विकासकामांमुळे धार्मिक वातावरण अधिक देखणे आणि सुविधायुक्त बनत आहे.ङ्गयाचबरोबर, चांदोरे गाव तलावाच्या सुशोभीकरणाचे कामही वेगाने सुरू आहे. तलाव परिसर स्वच्छ, सुशोभित आणि आकर्षक करण्यासाठी विविध कामे हाती घेण्यात आली असून, या विकासामुळे गावाच्या नैसर्गिक सौंदर्यात भर पडणार आहे. भविष्यात हा परिसर ग्रामस्थांसह पर्यटकांसाठीही आकर्षणाचे केंद्र ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.ङ्गधार्मिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक विकासकामांमुळे चांदोरे गाव नव्या रूपात उभे राहत असून, ग्रामस्थांनी या उपक्रमांचे स्वागत केले आहे. उर्वरित कामेही लवकर पूर्ण करून गावाच्या सर्वांगीण विकासाला आणखी चालना मिळावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.




## माणगाव बसस्थानकावर कचऱ्याचे साम्राज्य; प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर अस्वच्छतेमुळे दुर्गंधीचा त्रास; कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाईची प्रवाशांची मागणी.

माणगाव । प्रतिनिधी


संतोष मोरे

रायगड जिल्ह्यातील माणगाव बसस्थानक हे कोकण व घाटमाथ्याकडे जाणाऱ्या हजारो प्रवाशांचे महत्त्वाचे केंद्र आहे. मात्र, या बसस्थानकात आणि स्थानकाच्या पाठीमागील परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे प्रवाशांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून, आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.ङ्गस्थानक परिसरासह आजूबाजूच्या काही इमारतींमधूनही कचरा टाकला जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. परिणामी परिसरात घाण, दुर्गंधी आणि अस्वच्छ वातावरण निर्माण झाले असून, बसची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.ङ्गप्रवाशांच्या मते, बसस्थानक परिसरात कचरा टाकणाऱ्या तसेच कचरा जाळणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात यावी. त्याचबरोबर नियमित स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ ठेवण्याची गरज आहे.ङ्गबसस्थानक व्यवस्थापक सौ. कोळी व संबंधित कर्मचाऱ्यांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत स्वच्छतेसाठी प्रभावी उपाययोजना केल्यास माणगाव बसस्थानक रायगड जिल्ह्यातील आदर्श आणि स्वच्छ बसस्थानक म्हणून ओळख निर्माण करू शकते. यासाठी प्रशासन, कर्मचारी आणि नागरिक या तिन्ही घटकांनी संयुक्तपणे पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत प्रवासी व नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे.



## टीईटी परीक्षार्थींमध्ये तीव्र संताप व नाराजी पेपरफुटीच्या संशयामुळे टीईटी परीक्षा ऐनवेळी पुढे ढकलली

रा. जि. उ. उपसंपादक /मंगेश यादव :महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे रविवारी (ता. २८) संपूर्ण राज्यात घेण्यात येणारी शिक्षक पात्रता परीक्षा () ऐनवेळी पुढे ढकलण्यात आली आहे. परिणामी परीक्षार्थी आणि शिक्षकांमध्ये तीव्र संताप व नाराजी आहे. ङ्ग भिवंडी येथे परीक्षा सुरू होण्याच्या अवघ्या २४ तास आधी प्रश्नपत्रिका फुटल्याचा संशय आल्याने आणि पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केल्याने परीक्षा परिषदेने हा मोठा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील अधिकृत जाहीर प्रगटन परीक्षा परिषदेचे आयुक्त यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात आले आहे.ङ्ग मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी (ता. २७) पहाटेच्या सुमारास भिवंडी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली होती की काही इसमांकडे आगामी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील माहिती आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ संबंधित ठिकाणी धाड टाकली. यानंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना बोलावून पडताळणी केली असता, संशयितांकडे सापडलेले प्रश्न आणि मूळ प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न समान असल्याचे आढळून आले. या गंभीर प्रकारानंतर भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.ङ्ग परीक्षा पूर्ण पारदर्शकतेने व्हावी आणि या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, यासाठी २८ जून रोजी १०२८ केंद्रांवर होणारी ही परीक्षा तूर्तास पुढे ढकलण्यात येत असल्याचे परीक्षा परिषदेने स्पष्ट केले आहे.ङ्ग



हे अतिशय चुकीचे झाले आहे. पैशांसाठी काही लोक काही पण करतील. आम्ही दोन महिने त्रास घेऊन दिवस-रात्र अभ्यास करून शेवटी पदरी निराशाच आली. आता पुन्हा नव्याने सुरुवात करावी लागणार. प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या उमेदवारांना या भ्रष्ट यंत्रणेमुळे मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. असे कृत्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. ङ्गसंध्या कासारे, परीक्षार्थी, श्रीवर्धनङ्गपरीक्षार्थींचा संताप''पैशांसाठी काही पण करतील...''ङ्गऐन परीक्षेच्या आदल्या दिवशी परीक्षा रद्द झाल्याने लाखो उमेदवारांच्या स्वप्नांवर आणि कष्टांवर पाणी फेरले गेले आहे. परीक्षा केंद्रावर पोहोचण्याची तयारी करत असलेल्या उमेदवारांमध्ये या निर्णयामुळे प्रचंड संताप आणि निराशा पाहायला मिळत आहे. परीक्षेतील गैरप्रकार ताजा असतानाच आता राज्यातील परीक्षेबाबतही हेच घडल्याने विद्यार्थ्यांचा संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे.ङ्ग दोषींवर कठोर कारवाईची मागणीङ्ग ''केवळ परीक्षा पुढे ढकलणे हा उपाय नाही. यामागे मोठे रॅकेट असण्याची शक्यता आहे. सरकारने या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन शिक्षण क्षेत्राची बदनामी करणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या दोषींना कठोर शिक्षा केली पाहिजे, अशी मागणी शिक्षक प्रतिनिधींकडून होत आहे.

# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

भ्रष्ट क्रीडा धोरणामुळे गुणवंत खेळाडूवर अन्याय

नुकताच जागतिक ऑलिम्पिक दिवस साजरा करण्यात आला. याच आंतराष्ट्रीय स्तरावरील ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये आजवर भारतातील आणि आपल्या महाराष्ट्रातील देखील अनेक गुणवंत खेळाडूंनी अगदी हाताच्या बोटावर मोजता येण्याजोग्या पदकांवर आपले नाव कोरलेले आहे. कारण



अर्थातच,आपल्या राज्यात गुणवंत खेळाडूंना पोषक,प्रोत्साहनपर असं क्रीडा धोरण राज्य राबविण्याचा प्रयत्न जरूर करतेय,परंतु क्रीडा धोरणातील त्रुटी,आणि अधिकारी वर्गाची भ्रष्ट नीती यामुळे खेळाडूंवर अन्याय होतोय. राज्यातील याच असंख्य गुणवंत खेळाडूंना न्याय मिळवून देण्यासाठी संभाजीनगरचे राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षक महेश इंदापूरे यांनी आंदोलन सुरू केले आहे.त्याच अनुषन्गाने महेश यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

१राज्याच्या क्रीडा धोरणांत नेमक्या काय त्रुटी आहेत?

आपल्या महाराष्ट्रातील शिवछत्रपती पुरस्कार,अर्जुन पुरस्कार प्राप्त अनेक गुणवंत खेळाडू आहेत. अर्थात राज्यातील तमाम खेळाडूंसाठी राज्य सरकार चांगले क्रीडा धोरण राबविते,चांगल्या योजना राबविण्याचा प्रयत्न करते. परंतु या धोरणाची अंमलबजावणी करताना मात्र त्यात मोठा भ्रष्टाचार होताना दिसतो. म्हणूनच अनेक खेळाडू चांगल्या योजनांपासून वंचित राहतात. आपल्या राज्यात राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या खेळाडूला अवघ्या ११ हजारांचा लाभ मात्र हरियाणामध्ये अशा खेळाडूला ३ लाख आणि सरकारी नोकरी दिली जाते इतका फरक आहे. खेळाडूंसाठी अपघाती विम्याची तरतूद देखील नाही. प्रशिक्षक आणि पंचांना कमी मानधन,क्रीडा उपसंचालक सुहास पाटील यांचा कोट्यवधींचा घोटाळा अशा परिस्थितीत खेळाडूंवर प्रचंड अन्याय होतोय.

२याच पार्श्वभूमीवर आपल्या सरकारकडे काय मागण्या आहेत?

खेळाच्या आणि खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सरकारकडे काही मागण्या केलेल्या आहेत. सिबीएससी बोर्डाच्या धर्तीवर एस एस सी च्या विद्यार्थ्यांना देखील ग्रेस देण्यात यावी. क्रीडा आरक्षण हे ५ टक्क्यावरून दहा टक्के करण्यात यावे. राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या खेळाडूंना सरकारने नोकरी द्यावी. तसेच महिला खेळाडूंसाठी लाडकी खेळाडू योजना सरकारने राबवावि,खेळाडूंसाठी अपघाती विमा,क्रीडा धोरणातील भ्रष्टाचार मुक्ती,प्रशिक्षक आणि पंचांच्या मानधनात वाढ अशा आमच्या मागण्या आहेत.

३आपल्या अनेक देशी खेळांचा ऑलिम्पिक मध्ये समावेश करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत त्याबद्दल?

न क्की च , क ब ड्डी असेल,खोखो,आट्यापाट्या,लगोरी,मल्लखांब असे अनेक देशी खेळ हे आता क्रिकेटच्या बरोबरीनेच अगदी राष्ट्रीय स्तरावर परिचित होऊ लागलेलं आहेत. या खेळांमध्ये प्राविण्य मिळवणारे असंख्य खेळाडू आपल्या राज्यात आहेत. भविष्यात या अस्सल भारतीय खेळांना ऑलिम्पिक खेळांमध्ये स्थान मिळविण्यासाठी नक्कीच प्रयत्न करणार.

२ नोंद

मुंबईत संस्कारक्षम हेमोत्सव २०६ चे भव्य आयोजन

हेमा फौंडेशन हि सामाजिक संस्था आर आर ग्लोबल द्वारा संचालित एक परोपकारी सामाजिक संस्था असून,समाजात संस्कार,संस्कृती ,सभ्यता आणि नैतिक मूल्यांच्या प्रचार प्रसारासाठी कार्यरत आहे. लोकामध्ये मानवी निती मुल्याबाद्दल जागृती करणे हा हेमा फौंडेशन या संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. याच अनु शान्गाने दरवर्षी हेमोत्सव चे भव्य दिव्या आयोजन करण्यात येते.

महेंद्र काबरा यांच्या नेत्तृत्वाखाली तसेच जग प्रसिध्द मनो वैज्ञानिक आणि फिलिंग माइन्दूस चे संस्थापक तसेच हेमा फाउंडेशन चे ट्रस्टी डॉ. चिनू अग्रवाल यांनी हेम वर्चूज,इ लर्निंग पोर्टलच्या माध्यमातून मूल्याधारित शिक्षणाचा व्यापक प्रमाणात प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्य आजवर केलेले आहे. हे अभियान सध्या २६ राज्यातील जवळपास १५,५७४ शिक्षक आणि ४ लाख ९४ हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचलेले आहे. वेबिनार आणि विविध प्रशिक्षण मित्रांच्या मध्यमातून हि शृंखला सातत्यपूर्ण संपूर्ण देशभर अखंडपणे सुरु आहे. या म्हतापूर्ण कार्यात डॉ . चिनू अग्रवाल ट्रस्टी आणि संशोधन प्रमुख यांचे हेमा फाउंडेशनकृत कार्यात महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली हेम वर्चुअल अंतर्गत संपूर्ण मूल्याधारित अभ्यासक्रमाची निर्मिती झालेली आहे. आणि संपूर्ण शिक्षण सामग्री त्यांच्याच द्वारे पोर्टल वर अपलोड केली गेली आहे. दरवर्षी हेमा फाउंडेशन च्या स्थापना दिनाचे औचित्य साधूनच हेमोत्सवचे आयोचजण करण्यात येते. यामध्ये हेमश्रि,हेम सारथी,आणि हेम चॅम्पियन अशा पुरस्कारांचे वितरण केले जाते. ज्या समाजसेवकांनी सामूहिक रित्यामानवी मूल्यांची जपणूक,सुरक्षा,जिज्ञासा,स्वचत्तेचा प्रसार,निसर्गप्रेम,पर्यावरण रक्षण,जल संरक्षण,राष्ट्र प्रेम अशा विविध सामाजिक कार्यात भरीव योगदान दिले आहे त्यांना हे पुरस्कार दिले जातात. यंदा २७ जून रोजी मुंबईतील दादर सभागृहात या हेमोत्सवचे आयोचजण करण्यात आले आहे.

३ चला पर्यटनाला

अमरावतीचे भक्ती धाम मंदिर

अमरावतीमधील बडनेरा रोडवर स्थित, भक्ति धाम मंदिर म्हणजे राधाकृष्णा यांना समर्पित असलेले मंदिर असून अमरावती जिल्ह्यातील लोकप्रिय तीर्थक्षेत्र आहे. मंदिराच्या मुख्य गर्भगृहात संगमरवरी दगडाने बनवलेली श्रीकृष्णाची राधा यांच्या सुंदर मूर्ती आहेत. संत जलराम बाप्पाची (गुजरातमधील हिंदू संत) मूर्ती देखील मुख्य गाभाऱ्यात स्थापित केली गेली आहे. दरवर्षी हजारो भाविक या मंदिरास भेट देतात आणि सणांच्या वेळी मंदिराचे सौंदर्य खरोखरच एखाद्याला मंत्रमुग्ध करून टाकते.मंदिराच्या मागील बाजूस मंदिर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या देखरेखीत एक उद्यान तयार केलेले आहे. मंदिरात तीर्थयात्रा झाल्यानंतर शांततेत कायाकल्प होण्यासाठी, उद्यानात एक शांत आणि आनंददायी वातावरण आहे जे सर्वशक्तिमान देवाशी पवित्र संबंध स्थापित करते. हे पार्क मुलांना खूप आवडते.हे मंदिर अमरावती रेल्वे स्थानकापासून काही किलोमीटर अंतरावर आहे.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क –९८३३१४६३५६**
**इमेल –**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार २८ जून २०२६ 

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अमृत महोत्सवानिमित्त चिपळूणमध्ये रत्नागिरी जिल्हा अजिंक्यपद कॅरम स्पर्धेला प्रारंभ

उपसंपादक प्रदीप पवार

श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, चिपळूणच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त रत्नागिरी जिल्हा अजिंक्यपद कॅरम स्पर्धा २०२६-२७ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दि. २६ ते २८ जून २०२६ या कालावधीत चिपळूण अर्बन बँकेच्या कै. राजाभाऊ रेडीज सभागृहात पार पडणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार, दि. २६ जून रोजी सकाळी ११ वाजता झाले. श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने सदर स्पर्धा रत्नागिरी जिल्हा कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित केली आहे. या स्पर्धेत पुरुष एकेरी, पुरुष दुहेरी, महिला एकेरी, वयस्कर गट पुरुष, कुमार गट, कुमारी गट, किशोर गट आणि किशोरी गट अशा आठ गटांमध्ये सामने खेळविण्यात येणार आहेत. जिल्हयातील सन २०२६-२७ या हंगामातील ही पहिली स्पर्धा आहे. पुरुष दुहेरी गटातील सामने यंदापासून चार बोर्डांचे तीन सेट या पद्धतीने खेळविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. या स्पर्धेसाठी राष्ट्रीय, राज्यस्तरीय पंच काम पाहणार आहेत. स्पर्धा प्रमुख म्हणून चिपळूणातील श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष मोहनशेठ मिरगल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर स्पर्धा यशस्वी होण्यासाठी यावेळी मंडळाचे अध्यक्ष मोहनशेठ





मिरगल, कार्याध्यक्ष रमण डांगे, राजाभाऊ पाटणकर, जितेंद्र वेस्वीकार, सेक्रेटरी प्रभंजन पिंपुटकर, खजिनदार शेखर सावले, नित्यानंद भागवत, शिवप्रकाश घाटगे, विलास बांद्रे, सुरेश आवटे, सुनिल कुलकर्णी, समीर जानवलकर, चिन्मय फडके, मुन्ना वरवडेकर तसेच रत्नागिरी जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप भाटकर, ज्येष्ठ सल्लागार सुचय अण्णा रेडीज, सचिव मिलिंद सप्रे आणि खजिनदार नितीन लिमये हे प्रयत्न करत आहेत. या स्पर्धेच्या शुभारंभ प्रसंगी मान्यवरांबरोबरच नॅशनल चॅम्पियन रियाज अकबर अल्ली यांचा मंडळाचे वतीने व अर्बन बँकेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

## रासायनिक व विनाशकारी प्रकल्प कोकणात नको; संजय कोकरे यांची ठाम भूमिका पर्यावरण, स्थानिकांचे हित आणि शाश्वत विकासाला प्राधान्य देण्याची मागणी

कर्जत: जयेश जाधव

स्वतंत्र कोकण राज्य अभियानाचे संस्थापक संजय कोकरे यांनी कोकण परिसरात रासायनिक तसेच पर्यावरणाला हानी पोहोचविणाऱ्या विनाशकारी औद्योगिक प्रकल्पांना तीव्र विरोध दर्शविला आहे. कोकणाचा नैसर्गिक वारसा, जैवविविधता, शेती, मत्स्यव्यवसाय, पर्यटन आणि स्थानिक नागरिकांचे आरोग्य यांचे संरक्षण हे शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.ङ्ङकोकरे यांनी सांगितले की, कोणताही मोठा औद्योगिक प्रकल्प राबविण्यापूर्वी त्याच्या पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक ग्रामस्थांचा सहभाग, जनमताचा आदर आणि सर्व कायदेशीर व पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन होणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.ङ्ङविकासाच्या नावाखाली पर्यावरणाची हानी होऊन स्थानिक नागरिकांच्या जीवनमानावर विपरीत परिणाम होणार नाही, याची शासनाने खात्री करावी, अशी मागणी त्यांनी केली. विकास आणि पर्यावरण यामध्ये समतोल राखणारे धोरण स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.ङ्ङस्वतंत्र कोकण राज्य अभियानाने कोकणातील नैसर्गिक संपत्तीचे संवर्धन, स्थानिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि शाश्वत विकासाला प्राधान्य देणारे धोरण राबविण्याचे आवाहन केले आहे.ङ्ङयावेळी बोलताना संजय कोकरे म्हणाले, ‘‘कोकणाचा विकास हा पर्यावरण, स्थानिकांचे हित आणि शाश्वततेला केंद्रस्थानी ठेवूनच व्हावा. रासायनिक व विनाशकारी प्रकल्पांना कोकणात स्थान नसावे.‘‘



## शेत-पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे तातडीने हटवा व विकासकामांना गती द्या-योगेश कदम

दापोली प्रतिनिधी:- ङ्गमुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांना बारमाही आणि दर्जेदार रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी खेड येथील शासकीय विश्रामगृहात महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. यावेळी शेत-पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे तातडीने हटवून रस्त्यांच्या कामांना गती देण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.ङ्गबैठकीत खेड, दापोली आणि मंडणगड तालुक्यांतील शेत-पाणंद रस्त्यांची सद्यस्थिती, प्रलंबित कामे, रस्त्यांचे बळकटीकरण तसेच अतिक्रमण हटविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.ङ्गयावेळी बोलताना मंत्री योगेश कदम म्हणाले, ‘‘शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी बारमाही रस्ता मिळणे हा त्यांचा हक्क आहे. त्यामुळे सर्व विभागांनी समन्वय साधून अतिक्रमणे तात्काळ दूर करावीत आणि रस्त्यांची कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करावीत.‘‘ङ्गबैठकीदरम्यान उपस्थित नागरिकांच्या विविध समस्या व निवेदने स्वीकारून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वय राखून योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.ङ्गया बैठकीस प्रांताधिकारी विजय सूर्यवंशी, तहसीलदार अर्चना बोंबे, गटविकास अधिकारी गणेश मंडलिक यांच्यासह किशोर देसाई, अण्णा कदम, सचिन धाडवे, डॉ. आफिया पालेकर, दापोली पंचायत समिती सभापती उन्मेष राजे, निलेश शेठ,खेड नगरपरिषदेचे पदाधिकारी, तिन्ही तालुक्यांतील लोकप्रतिनिधी, पंचायत समिती सदस्य तसेच सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद बांधकाम, ग्रामीण पाणीपुरवठा, भूमी अभिलेख, महसूल व पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## लोकराजा छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त कामोठ्यात अभिवादन कार्यक्रम संपन्न

नवी मुंबई / प्रतिनिधी

लोकराजा, आरक्षणाचे जनक आणि सामाजिक न्यायाचे प्रणेते छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कामोठे शहर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सेक्टर-११ येथील नालंदा बुद्ध विहारच्या पाठीमागील पक्ष कार्यालयात नुकताच अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी वनिता साळवे यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



त्याचप्रमाणे आशा लवांडे, सुप्रिया कांबळे आणि सुनीता उके यांनी या अभिवादनास अनुमोदन दिले. तसेच अण्णासाहेब मगाडे यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

सदर कार्यक्रमात आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक दीपक दादा जाधव यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आरक्षणविषयक ऐतिहासिक कार्याचा सविस्तर आढावा घेतला. सामाजिक न्यायाची पायाभरणी करताना शाहू महाराजांनी केलेल्या कार्याची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी आनंद कसारे यांनी उपस्थित मान्यवर व कार्यकर्त्यांचे आभार मानले. या प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एकाच रात्री नागोठण्यात तीन ठिकाणी धाडसी चोरी; सपोनि रविंद्र पारखे यांच्या समोर चोरट्यांचे आव्हान!

सहसंपादक -: नारायण म्हात्रे

येथील नागोठणे सहकारी भातगिरणी शॉपिंग सेंटरमधील एका रात्रीत तीन दुकान गाळ्याचे पत्रे तोडून चोरट्यांनी दुकानातील रोख रक्कम व मुद्देमाल चोरुन नेल्याने नागोठणे येथे नव्याने आलेले पोलिस ठाण्याचे प्रभारी

सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांच्यासमोर मोठे आव्हान उभे केले असून मुंबई गोवा महामार्गालगत असणा-या भात गिरणीच्या चाळीतील अनुक्रमे हॉटेल, जनरल स्टोअर्स अशा दुकानांतील

रोख रक्कम जवळपास दहा ते विस हजार व मुद्देमाल लंपास केल्याने या धाडसी चोरीमुळे नवनियुक्त प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी पदभार घेताक्षणी महामार्गालगतच असणा-या शॉपिंग सेंटरमधील चोरांनी दुकान फोडल्याने मोठे आव्हान उभे ठाकले आहे. नागोठणे येथे पुन्हा चोरांनी डोके वर काढल्याने नागोठणे शहर व विभागात लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.




सदरच्या चोरीच्या घटनेतील चोर लवकरात लवकर पकडले जावेत अशी मुख्य मागणी याठिकाणी होत आहे.ङ्ग सदरच्या झालेल्या चोरीचा तपास नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे हे करीत आहेत.

## पाटपन्हाळे महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पाटपन्हाळे एज्युकेशन सोसायटीचे पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आय. क्यु. ए. सी. अंतर्गत सांस्कृतिक विभागाच्यावतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद देसाई यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती ‘‘सामाजिक न्याय दिवस‘‘ म्हणून साजरा करण्यात आला.ङ्गकार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद देसाई याच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. प्रमोद देसाई यांनी आपल्या मनोगतातून राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष




भर दिला. कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. विविध धर्मातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून राजाज्ञा काढली. राधानगरी धरण बांधून शेतीला प्रोत्साहन दिले. सरकारी नोकरीमध्ये मागास वर्गासाठी पन्नास टक्के आरक्षण दिले. आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. अशा विविध सामाजिक कार्यातून संक्षेपात आढावा घेतला. अशा थोर महापुरुषाला आपण सर्वांनी अभिवादन करून त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेऊन ते आचरणात आणावे म्हणजे खऱ्या अर्थाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज या महापुरुषाला अभिवादन केले असे म्हणता येईल असे म्हटले.ङ्गसदर कार्यक्रमाला सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. जालिंदर जाधव, डॉ. प्रवीण सनये, डॉ. दिनेश पारखे, प्रा. लंकेश गजभिये, प्रा. सुभाष घडशी, श्री. परशुराम चव्हाण, महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होतेङ्गया कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जालिंदर जाधव यांनी केले तर उपस्थित मान्यवर यांचे आभार डॉ. प्रवीण सनये यांनी मानले.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )